# जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड तर्फे आपले स्वागत आहे.

# जिल्हा उद्योग केंद्रातर्फे राबविण्यात येणा-या योजनां:

## १. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम

ग्रामीण व शहरी भागात, रोजगार निर्मिती होण्यासाठी केंद्र शासनाने, नुकतीच पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांची घोषणा केली आहे. ग्रामीण रोजगार निर्मिती कार्यक्रम व पंतप्रधान रोजगार योजना एकत्रित करुन, नवीन योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत १५ ते ३५ % पर्यंत बिनव्याजी मार्जीनमनी देण्यात येणार असून विविध उद्योग व सेवा व्यवसाय या अंतर्गत सुरु करता येतील. बँकेच्या नियमित परतफेडीनंतर, मार्जिनमनीचे अनुदानात रुपांतर होईल.

### योजनेची ठळक वैशिष्टये :

i) योजनेची, उद्योगासाठीची मर्यादा रु.२५.०० लाख असून, सेवा व्यवसायासाठी ही मर्यादा रु. १०.०० लाख एवढी आहे.

| अक्र | संवर्गानुसार लाभार्थी | लाभार्थी सहभाग प्रकल्पाप्रमाणे | प्रकल्पानुसार मार्जिनमनी | |
|---|---|---|---|---|
| | | | शहर | ग्रामीण |
| १ | सर्वसाधारण संवर्गातील लाभार्थी | १० टक्के | १५ % | २५ % |
| २ | अल्पसंख्यांक, SC/ST/OBC महिला, माजीसैनिक,अपंग,डोंगरी व सिमावर्ती पुर्व | ५ टक्के | २५ % | ३५ % |

### ii) अर्जदाराची पात्रता :

a) अर्जदार, कमीत कमी १८ वर्षाचा असावा

b) यासाठी कुठल्याही उत्पन्नाची अट नाही.

c) रु.१० लाखापर्यंत,उद्योगासाठी व रु.५ लाखापर्यंत, सेवाव्यवसायासाठी कुठल्याही शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता नाही.

d) रु.१० लाखावरील उद्योगासाठी व रु. ५ लाखावरील सेवाउद्योगासाठी, अर्जदार, कमीत कमी, ८ वी पास असणे, आवश्यक आहे.

e) केवळ,नवीन,उद्योगासाठी/ सेवा व्यवसायासाठी ही योजना पात्र राहील.

f) स्वयंसहाय्यता बचत गट सुध्दा या योजनेत पात्र आहेत

g) नोंदणी झालेल्या संस्था/धर्मादाय संस्था यात पात्र राहतील.

h) प्रकल्प किंमतीमध्ये,भांडवली खर्च व खेळत्या भांडवलाचा समावेश राहील. खेळत्या भांडवलाशिवाय असणारे प्रकल्प,यात पात्र राहणार नाहीत.

## आवश्यक कागदपत्रे :

i) वयाचे प्रमाणपत्र, ii) शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र iii) रहिवासी प्रमाणपत्र.
iv) फोटो v) दरपत्रक/ बांधकाम असल्यास बांधकामाचे अंदाजपत्रक.
vi) जातीचे प्रमाणपत्र. vii) प्रकल्प अहवाल.
viii) जागा मालकी हक्क प्रमाणपत्र अथवा भाडे पावती.
ix) स्थानिक स्वराज्य संस्थेचे, ना हरकत प्रमाणपत्र.

# २. सुशिक्षित बेरोजगारासाठी, बीज भांडवल योजना :

## पात्रता :

अ. अर्जदार किमान सातवी पास असावा.
ब. वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे
क. उमेदवार बेरोजगार असावा.
ड. उमेदवाराचे, महाराष्ट्रात, किमान पंधरा वर्षापासून वास्तव्य असावे.

## ठळक वैशिष्ट्ये :

i) योजनेत पात्र उद्योग/व्यवसायाच्या प्रकल्प खर्चाची कमाल मर्यादा रु २५ लाख राहील व त्यात एकूण स्थिर भांडवली गुंतवणूक व खेळत्या भांडवलाचे सीमांतिक भांडवल अंतर्भूत राहील.

ii) बीजभांडवल १५% प्रमाणे, जास्तीत जास्त रु. ३ लाख ७५ हजार एवढे राहील.

iii) दहा लाख रुपयापेक्षा कमी प्रकल्प खर्च असलेल्या प्रकरणांमध्ये अनुसूचित जाती/जमाती/इतर मागासवर्गीय/ अपंग/भटक्या विमुक्त जाती जमातीसाठी बीजभांडवल, प्रकल्पाच्या २०% अनुज्ञेय राहील.

iv) कर्जफेड, कर्ज दिल्यानंतर व्यापार व सेवा उद्योगासाठी सहा महिन्यांचा विलंब अवधीनंतर सहा महिन्यापासून साडे चार वर्षापर्यंत व लघुउद्योगासाठी दोन वर्षाचा विलंब अवधीनंतर ३ ते ७ वर्षात ५ हफ्त्यात परतफेड राहील.

v) बीजभांडवल कर्जासाठी, व्याजाचा दर द.सा.द.शे. ६ % असून, नियमित परतफेड करणा-या लाभार्थीस ३ % सवलत देण्यात येईल व थकबाकीदारास, १% दंडव्याज आकारण्यात येईल.

vi) बीजभांडवल कर्जाचा गैरवापर करणा-यास, २% दंडव्याज लावून एक रकमी वसूली करण्यात येईल. थकीत बीजभांडवल वसूलीसाठी, महसुली कार्यवाही करण्यात येईल.

v) बीजभांडवल कर्ज मंजूरीनंतर, जिल्हा उद्योग केंद्राचे, नांवे दुसरा अधिभार नोंदणे आवश्यक.

## ३. जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना

### वैशिष्टये :

i) शिक्षणाची व वयाची अट नाही.

ii) हया योजनेत उद्योग व सेवा उद्योग (ट्रक, रिक्षा, टेम्पो व हॉटेल सोडून इतर सेवा उद्योग) यासाठी कर्ज मिळू शकते.

iii) योजनेत यंत्रसामुग्रीमधील एकुण गुंतवणूक रु. २ लाखाच्या आत असावी.

iv) ही योजना १९८१ च्या जनगणनेनुसार १ लाखापर्यंत, लोकसंख्या असलेल्या गावात/ग्रामीण भागातच लागू आहे.

iv) योजनेखाली उद्योग व सेवा तसेच अस्तित्वात असलेल्या लघुउद्योगाच्या वाढीसाठी, अर्ज करता येतो.

v) प्रकल्पातील ७५ टक्के कर्ज मिळण्यासाठी वित्तीय संस्थेकडे (राष्ट्रीय बँका, व्यापारी बँका व व्यापारी सहकारी बँका) अर्ज पाठविण्यात येतो.

vi) एकूण प्रकल्प खर्चाच्या, सर्वसाधारण घटकांना, २० % प्रमाणे रु. ४००००/- पर्यंत व अनु.जाती/जमातीसाठी ३०% प्रमाणे रु. ६०,०००/- पर्यंत मार्जीन मनी ४ % दराने मिळेल ही रक्कम पाच वर्षात, परतफेड करावयाची आहे.

## ४. सामुहिक प्रोत्साहन योजना - २००७ :

औद्योगिकदृष्टया, अविकसित व विकसनशील भागात, मोठया प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक व्हावी, या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने १ एप्रिल २००७ पासून सामुहिक प्रोत्साहन योजना-२००७ अंमलात आणली आहे. वैयक्तिक भागीदारी, खाजगी क्षेत्र राज्यस्तरीय सार्वजनिक संस्था/संयुक्त क्षेत्रे आणि सहकारी क्षेत्रात असलेले लघुउद्योग घटकास १.४.०७ ते ३१.३.२०११ पर्यंत परिणामकारक टप्पे पूर्ण करुन अर्ज सादर करावयाचे आहेत. शासनाने तालूक्यांची, त्यांच्या औद्योगिक विकासाच्या प्रतवारीनुसार अ,ब,क,ड,ड+ आणि विना उद्योग जिल्हा अशा सहा गटांत विभागणी करण्यात आली आहे. नांदेड जिल्हयातील सर्व तालूक्यांचा समावेश ड+ वर्गवारीत करण्यात आलेला आहे.

नांदेड जिल्हयासाठी, खालीलप्रमाणे औद्योगिक प्रचलन अनुदान दरवर्षी उद्योगाने, राज्य शासनास किंवा शासनाच्या विभागास/यंत्रणेस भरलेल्या करातून २५% प्रमाणे वितरीत करण्यात येणार आहे.

| अ.क्र. | उद्योगांची वर्गवारी | अनुदान | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | सुक्ष्म व लघुउद्योग | ५०% | ९ वर्षे |
| २. | मध्यम व मोठे उद्योग | ३० % | ७ वर्षे |

याशिवाय खालील प्रोत्साहने, सामुहिक प्रोत्साहन योजना-२००७ अंतर्गत देण्यात येणार आहेत.

i) टेक्सटाईल, होजिअरी, विणकाम व तयार कपडयांच्या उद्योगांना जास्तीत जास्त ५% द.सा.प्रमाणे ६ वर्षासाठी जास्तीत जास्त २५ लक्ष व्याज अनुदान देण्यात येणार आहे.

ii) विद्युत शुल्क १५ वर्षासाठी पूर्णपणे माफ.

ii) १.४.२००७ ते ३१.३.२०११ या कालावधीमध्ये उद्योग उभारणी-साठी अभिहस्तांतरण,तारण गहाण,भाडेपट्टा वगैरेसाठी मुद्रांकशुल्क माफ.

iv) तांत्रिक आधुनिककरणासाठी केलेल्या गुंतवणूकीच्या ५ टक्के प्रमाणे जास्तीत जास्त रु. २५ लक्ष अनुदान.

v) गुणवत्ता प्रमाणपत्राच्या खर्चाच्या ५० % जास्तीत जास्त रु. एक लक्ष अनुदान.

vii) प्रदुषणमुक्त उत्पादनासाठी २५% जास्तीत जास्त रु.५ लक्ष अनुदान.

viii)पेटंट नोंदणीसाठी खर्चाच्या ५०% जास्तीत जास्त रु. ५ लक्ष अनुदान.

viii) मानव निर्देशांक कमी असलेल्या जिल्हयात, भविष्य निर्वाह निधी व E.S.I. अंतर्गत भरलेल्या रकमेच्या ७५ % परतावा.

## ५. लघु उद्योग नोंदणी

एमएसएमईडी कायदा-२००६ अंतर्गत, उद्योगासाठी ज्ञापन स्वीकृतीचा कायदा दि. २.१०.२००६ पासून लागू करण्यात आला आहे. सदर कायदयातंर्गत, खालीलप्रमाणे, यंत्रसामुग्री गुंतवणूकीप्रमाणे ज्ञापन स्वीकृती देण्यात येईल.

| अ.क्र. | उद्योगाचे वर्गीकरण | उद्योगाचे स्वरुप व उत्पादक उद्योग | गुंतवणूक मर्यादा |
|---|---|---|---|
| १. | सुक्ष्म उद्योग | रु.२५.०० पर्यंत | रु.१०.०० लाखापर्यंत |
| २. | लघु उद्योग | रु.२५ लाख ते ५ कोटी | रु.१० लाख ते २ कोटी |
| ३. | मध्यम उद्योग | ५ कोटी ते १० कोटी | रु.२ कोटी ते ५ कोटी |

सदर स्वीकृती दोन प्रकारची असून प्रस्तावित उद्योग घटकांना भाग-१ मध्ये स्वीकृती देण्यात येईल व त्याची वैधता २ वर्षे राहील. उत्पादनात असलेल्या घटकांना भाग-२ मध्ये स्वीकृती देण्यात येईल. सदर नोंदणी (स्वीकृती) प्रमाणपत्रावर, राज्य व केंद्र शासनाचे सर्व सोयी सवलती मिळतील.

## ६. लघुउद्योग घटकांना, जिल्हा पुरस्कार

लघुउद्योग घटकाच्या, उत्पादनांचा दर्जा, उत्तम रहावा व स्पर्धात्मक वातावरण निर्मितीच्या दृष्टीने, राज्य शासनातर्फे, उत्कृष्ट लघुउद्योग घटकांची निवड करुन पुरस्कार दिले जातात. पात्र उद्योजकांनी, विहीत नमुन्यात अर्ज करावयाचे असतात. अर्जाचा नमुना, जिल्हा उद्योग केंद्राच्या कार्यालयात विनामुल्य दिला जातो. प्रथम पुरस्कार रु. १५०००/- रोख, गौरवचिन्ह व शाल, द्वितीय पुरस्कार रु. १००००/- रोख, गौरव चिन्ह व शाल यथोचित सत्कार करण्यात येतो.

## पात्रता :

i) अर्जाचे वेळी, स्थायी लघुउद्योग नोंदणी ही, ३ वर्षाच्या पूर्वीची असावी.

ii) कमीत कमी, मागील दोन वर्षापासून सतत उत्पादन चालू असावे.

iii) वित्तीय संस्थांचे, थकबाकीदार नसावा.

## ७) जिल्हा उद्योग मित्र (झुम)

मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली, या समितीची सभा घेतली जाते. या सभेत, उद्योजकांचे अडीअडीचणीबाबत सविस्तर चर्चा होवून, प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. त्याकरिता उद्योजकाने, त्यांचे अडचणीबाबत, जिल्हा उद्योग केंद्राकडे लेखी निवेदन दिले पाहिजे.

## ८) केंद्र शासनाच्या विविध योजना :

i) सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगासाठी केंद्र शासनाच्या विविध योजनांसाठी उदा : केंद्रीय खरेदी, विविध पॅकेजेस तसेच आयआयडीसाठी पहा www.dc.msme.nic.in

ii) सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगासाठी सिडबीच्या विविध योजनांसाठी पहा www.sidbi.com

iii) नाबार्डच्या विविध योजनांसाठी
उदा : ग्रामीण भंडारण, पायाभूत सुविधा पहा
www.nabard.in, www.ruralgodown.in

iv) केंद्र शासनाच्या अन्न प्रक्रिया उद्योगासाठी असलेल्या विविध योजनाबाबत पहा
www.mofpi.nic.in

## ९) उद्योग निरीक्षक यांचे तालूक्याचे ठिकाणी दौ-याचे दिवस

| अक्र | उद्योग निरीक्षकाचे नांव | तालूका | वार | भ्रमणध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.ए.एस.मुपडे | किनवट<br>माहूर | बुधवार<br>गुरुवार | ९३२५०२२७५५ |
| २. | श्री.बी.एस. आगवणे | कंधार<br>लोहा<br>अर्धापूर | मंगळवार<br>गुरुवार | ९८६००५०१७४ |
| ३. | पी.आर. गजभारे | बिलोली<br>धर्माबाद | बुधवार<br>शुक्रवार | ९४२२८७४२४९ |
| ४. | जे.एस. देशमुख | हदगांव<br>हिमायतनगर | मंगळवार<br>गुरुवार | ९४२३६१४२४४ |
| ५. | श्री.के.जी. पिल्लेवाड | देगलूर मुखेड<br>नायगांव | बुधवार<br>गुरुवार<br>गुरुवार | ९४२१२९२८८९ |
| ६. | श्री. आर.एल. राठोड | भोकर<br><br>उमरी<br><br>मुदखेड | १ला व ३ रा मंगळवार<br>१ ला व ३ रा बुधवार<br>२ रा व ४ था मंगळवार | ९४२१६८९४५० |